**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1180/2007.**

श्री शामसुंदर सत्यनारायणजी अग्रवाल
रा. विवेकानंद नगर, तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अ. प्रा. हांडा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग 1 (नि.श्रे.)
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर भंडारा
ता. जि. भंडारा.

2) श्री आर. डी. गोगरकर
जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक, तुमसर
तहसिल कार्यालय तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.11.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे वकील श्री दि. पी. रावलानी व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2006 रोजीच्या अर्जाप्रमाणे "Letter of Police Department dtd 1.12.2003 into the inquiry matter against Patiram Sarve +2 which had received your office on 2.12.2003. Issu Certified copy of inquiry letter of the Police Department dtd 1.12.2003 received by your office on 2.12.2003 and further action taken by your office." अशी माहिती मागितलेली दिसून येते.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.8.2006 रोजी विषयांकित प्रकरणी संदर्भात अर्ज या कार्यालयास दि. 11.8.2006 रोजी प्राप्त झाला यात आपण पोलीस विभागाद्वारे दि. 1.12.2003 ला या कार्यालयात पाठविण्यात आला. पत्राची प्रमाणीत प्रत आपण मागणी केली आहे. सदर पत्र हे गृह विभागाचे असल्याने याबाबतच्या प्रमाणित प्रतीची मागणी कृपया आपण संबंधित विभागाकडे करावी. या पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाने दिलेल्या उत्तराची प्रत बाबतची माहिती तयार आहे. याबाबत आवश्यक ती शासकीय फी बाबतचा भरणा करण्यात यावा व त्यानंतर आपणास माहितीची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 18.8.2006 रोजी अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2006 च्या पत्राच्या अनुषंगाने प्राप्त करावयाची प्रत श्री गोपाल द्वारकादास पांडे यांना अधिकार प्रदत्त केला आहे तरी त्यांना माहिती देण्यात यावी असे पत्र दुय्यम निबंधक, तुमसर यांना दिले असून माहितीची प्रत एक नग मिळाली अशी पोच दिलेली दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.9.2006 रोजी देण्यात आला असून निर्णयाच्या वरुन असे दिसून येते की अधिनियमाच्या कलम 8 (ज) नुसार मागणी केलेले पत्र हे चौकशीच्या कामी पोलीस विभागाने दिलेल्या उत्तराची प्रत पुरविल्याचे दिसून येते. त्यानंतर त्या प्रतीवर केवळ शासकीय कार्यालयीन उपयोगासाठी असा शेरा दिलेला आहे असेही नमुद केलेले आहे. कलम 8 (ज) नुसार गुन्हेगाराचे अन्वेशन करण्यास करण्यास किंवा त्यांना अटकाव करण्यास किंवा त्यांचेवर खटला

दाखल करण्यास अडथळा येवू शकेल याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रतीवादीने त्यांचे पत्र दि. 16.8.2006 नुसार सदरहू प्रकरणात चौकशी पूर्ण झाली किंवा नाही हे त्यांच्या स्तरावर सांगता येत नसल्यामुळे संबंधित विभागाकडून अपिलार्थीनी आवश्यक पत्राची प्रत घेण्यास विनंती केलेली आहे. या उपरही त्यांनी पोलीस विभागाचे पत्रावर त्यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या पत्राची प्रत अपीलार्थीना दिली आहे व त्या कारणास्तव केलेली कार्यवाही अधिनियमातील तरतुदीनुसार असल्यामुळे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या दिलेल्या निर्णयामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

4. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. दिपक रावलानी यांनी असा युक्तिवाद केला की प्रथम अपीलातील निर्णयातील कलम 8 (ज) च्या तरतुदी हया सदरच्या माहितीच्या मागणीच्या करीता लागू होत नाही. अपीलकर्ता यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. परंतु तक्रारीच्या संदर्भामध्ये कार्यवाही काय झाली हयाबद्यल माहितीच्या अधिकारात पोलीस स्टेशनमध्ये माहिती मागितली होती परंतु तक्रारच दाखल नाही असे उत्तर आल्यामुळे सदरच्या तक्रारीनुसार जी कार्यवाही झालेली होती त्या संबंधीचे पत्र दुय्यम निबंधक यांना पोलीस स्टेशनकडून पाठविले होते व त्यामुळे त्या पत्राची छायांकित प्रमाणित प्रत माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक यांचेकडे मागितली होती व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 8 (ज) हा लागू होत नाही असा त्यांचा युक्तिवाद आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक यांनी असे सांगितले की पोलीस स्टेशनकडून आलेले पत्र हे चौकशीच्या संदर्भात होते. ते त्या विभागाचे असल्यामुळे त्या पत्राची प्रमाणित प्रत देणे हे योग्य नव्हते तसेच त्या सदरच्या पत्रावर केवळ शासकीय कार्यालयीन उपयोगासाठी असा शेरा दिलेला असल्यामुळे त्या विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावी असे उत्तर दिलेले होते. परंतु त्या पत्रावरील कार्यवाहीची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली होती. यावरुन अधिनियमाच्या कलम 8 (ज) ची तरतुदी ही सदरच्या प्रकरणात लागू होत नसली तरी मुळ पत्र हे पोलीस विभागाचे असल्यामुळे

सदरच्या पत्राची प्रमाणित प्रत देता येत नाही हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे सद्भावनेने आहे असे दिसून येते. कारण त्यांनी त्या पत्रावरील झालेली कार्यवाही मात्र उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यावरुन माहिती देण्याची टाळाटाळ केली आहे किंवा माहिती नाकारली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. परंतु सदरच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की सदरच्या पत्रामध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या पोलीस स्टेशनमध्ये केलेल्या तक्रारीतीलच मजकूर दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची गोननियता पाळण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे सदरच्या पत्राची छायांकित प्रत हे अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मात्र जन माहिती अधिकारी यांचे म्हणणेप्रमाणे प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्याच्या ऐवजी छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे नियमानुसार राहिल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून तीन दिवसाचे आत अपीलकर्ता यांनी मागितलेल्या पत्राची छायांकित प्रत ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 11.3.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1306-1309